# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

क्रमांक :५(३)/वेनि/शिक्षकीय पदे/२०१३/७०७०५
दिनांक ९.१२.२०१३

प्रति,
१.सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर
२. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालये
३. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतने
४.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : शासकीय अभियांत्रिकी/औषध निर्माण शास्त्र महाविदयालयातील/तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यातांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या करीअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणीनुसार देय रक्कमेच्या फरकाचे विवरणपत्रास प्रमाणित करण्याबाबत...

संदर्भ :१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एसपीसी २०१०/(३४/१०)/तांशि-२, दिनांक २० ऑगस्ट, २०१०
२. हया संचालनालयाचे पत्र क्र. ५(३)/वेनि/शिक्षकीय पदे/२०११/३३२१३ दिनांक ४.५.२०११

उपरोक्त संदर्भाधिन दिनांक २० ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयान्वये या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील शिक्षक तसेच ग्रंथपालांना सहावा वेतन आयोगाच्या धर्तीवर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शिफारस केलेल्या वेतनश्रेण्या व सुधारित सेवा शर्ती दिनांक १-१-२००६ पासून लागू करण्यांत आलेल्या आहेत. सदरच्या वेतनश्रेणींच्या अनुषंगाने संबंधित संस्थांतील शिक्षकांची वेतननिश्चिती करण्याचे काम या संचालनालयाकडून करण्यांत आले आहे.

या अनुषंगाने संस्थांतील शिक्षकांची भविष्य निर्वाह खात्यात जमा करण्यांत येणाऱ्या वेतन फरकाची विवरणपत्रे तपासणी करण्यासाठी या कार्यासनास प्राप्त झाली आहेत. तर काही संस्थांनी संस्थास्तरावर सदरची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याची कार्यवाही केलेली आहे. ही बाब लक्षात घेता सर्व शासकीय तसेच अशासकीय अनुदानित संस्थांतील संस्थाप्रमुखांना खालीलप्रमाणे कळविण्यांत यावे.

तंत्रशिक्षण संचालनालयाने वेतननिश्चतीच्या विवरणपत्रास मान्यता दिल्यानंतर शासकीय संस्थांतील शिक्षकांची वेतन देयके संबंधित कोषागारात पाठविली जातात. तसेच कोषागारात सदरच्या देयकांची छाननी वेतननिश्चितीच्या मान्यता दिलेल्या प्रपत्राप्रमाणे करुन ती तपासली जाते. सदर बाब पहाता, शासकीय संस्थांतील शिक्षकांची भविष्य निर्वाह खात्यात जमा करण्यांत येणाऱ्या वेतन फरकाची विवरणपत्रे या संचालनालयाने वेतननिश्चतीस मान्यता दिल्यानंतर पुनश्च तपासणीसाठी संचालनालयास करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे ती तपासणीसाठी या कार्यालयाकडे पाठविण्यांत येऊ नयेत.

सदरची रक्कम शासन निर्णयातील तरतूदींनुसार संबंधितांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याची कार्यवाही संस्था स्तरावर करण्यांत यावी. मात्र फरकाच्या रकमेच्या विवरणाच्या अचूकतेची पडताळणी संस्थांच्या प्रशासकीय अधिकारी/प्रबंधक यांनी प्रमाणित करावीत.

अशासकीय अनुदानित संस्थांतील शिक्षकांची देयके कोषागारात सादर केली जात नाहीत त्यामुळे ती कोषागारात तपासली जात नसल्यामुळे ती तपासणे आवश्यक आहे. तरी, सर्व अशासकीय अनुदानित संस्था प्रमुखांना कळविण्यांत यावे की, तंत्रशिक्षण संचानालयाकडून वेतननिश्चतीस मान्यता दिल्यानंतर संबंधित शिक्षकांची शासन निर्णयातील तरतूदींनुसार भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या वेतन व भत्यातील फरकाच्या रकमेच्या विवरणाच्या अचूकतेची पडताळणी संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडून तपासून घेण्यात यावीत व ती प्रमाणित करुन घ्यावीत.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय तसेच अशासकीय अनुदानित संस्थांच्या संस्थाप्रमुखांच्या नजरेस सदरची बाब लक्षात आणून देऊन याबाबतची तरतूद अर्थसंकल्पीत करण्याबाबतची कार्यवाही करुन झाल्यानंतरच सबंधितांना देय ठरणारा वेतनातील फरकाची थकित रक्कम जमा करण्यापूर्वी सहसंचालकांनी स्वतः विवरणपत्राची पडताळणी करावी किंवा त्यांचे कार्यालयातील दुय्यम राजपत्रित अधिका-यांना यासाठी प्राधिकृत करावे याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत अनुपालन करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.: संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय
मुंबई-१

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

**प्राचार्य,** शासकीय तंत्रनिकेतन,

औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर

**उपसचिव,** महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१३/ 9077
दिनांक 19 DEC 2013

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेतील अधिव्याख्यातांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या करीअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरिष्ठश्रेणी/ निवडश्रेणीनुसार देय रक्कमेच्या फरकाचे विवरणपत्रास प्रमाणित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रत - या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव, तसेच वरील पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी.